मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » मंगळवार, दि. 19 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडच्या 'शाश्वत विकास'साठी एक मत मोलाचे!

## महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांचे आवाहन : मतदार संघात '20 कलमी निर्धार' संकल्प पत्राचे प्रकाशन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा शाश्वत विकासाचा संकल्प केला असून, त्यासाठी भोसरी विधानसभा मतदार संघात निवडणुकीच्या निमित्ताने '२० कलमी निर्धार' कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवडकरांचे एक-एक मत मोलाचे आहे. १० वर्षांत केलेली विकासकामे आणि सोडवलेले प्रलंबित प्रश्न आणि हाती घेतलेले महत्त्वकांक्षी प्रकल्प शहराला 'विकासाचे रोलमॉडेल' बनेल, असा विश्वास भाजपा- शिवसेना- एनसीपी- आरपीआय- मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे भोसरी मतदार संघातून भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते चिखली येथील जाहीर सभेत संकल्प पत्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव यांच्यासह महायुतीचे सर्व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ... असा आहे 20 कलमी निर्धार कार्यक्रम!

» आमदार महेश लांडगे यांच्या संकल्प पत्रामध्ये २० कलमी निर्धार कार्यक्रमाचा समावेश आहे. त्यामध्ये पाणी पुरवठा सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, शिक्षणाच्या नव्या संधी, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन, उद्योग धंदे- व्यवसायांना 'रेड कार्पेट', सार्वजनिक वाहतूक सक्षमीकरण, वीज पुरवठा आणि वाहतूक कोंडीमुक्त मतदार संघ, आरोग्य व वैद्यकीय सेवा सक्षमीकरण, साहित्य व सांस्कृती जतन, कामगार सुविधा आणि रोजगाराच्या संधी, गतीमान प्रशासन, उद्यान व निसर्ग परिसंस्था जतन, सेवा-सुरक्षा आणि समर्पण, इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, प्रलंबित प्रश्नांचा निपटारा, शेती-माती-संस्कृतीचा वारसा आणि देव-देश-धर्माभिमान यासह सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्याची 'गॅरंटी' आमदार महेश लांडगे यांच्या संकल्प पत्रात आहे. विशेष म्हणजे, महिला सक्षमीकरण व एक हात मदतीचा अशी सामाजिक बांधिलकी आणि 'व्हीजन पिंपरी-चिंचवड' असा व्यापक आणि दूरदृष्टीचा निर्धार आमदार लांडगे यांनी केला आहे.

### आता विकासाचे रोल मॉडेल पिंपरी-चिंचवड...

» महायुती सरकारच्या धोरणात महाराष्ट्र राज्य आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सेमी कंडक्टर आणि हरित उर्जा प्रकल्पांमुळे देशात येणाऱ्या एकूण गुंतवणुकीपैकी ५२ टक्के गुंतवणूक आपल्या महाराष्ट्रात होते आहे, अशी निश्चितच आश्वासक बाब आहे. गेल्या १० वर्षांमध्ये मी पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यावर भर दिला. भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांमध्ये केलेल्या विकासकामांमुळे आजच्या घडीला 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित झाला आहे. विकासाची ही गती आणि प्रगती कायम ठेवल्यास पिंपरी-चिंचवड शहर राज्यातच नव्हे, तर देशात विकासाचे 'रोल मॉडेल' म्हणून अग्रगण्य राहील, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

संकल्प पत्रात आमदार लांडगे यांनी म्हटले आहे की, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळातील अडीच वर्षांचा कालावधी वगळता शहर प्रगतीच्या दिशेने झेपावत आहेत. महाविकास आघाडीची सत्ता असताना अनेक प्रकल्प रखडले, प्रलंबित प्रश्न लांबणीवर पडले आणि विकासकामांचा निधी अक्षरश: अन्य कामांकडे वळवण्यात आला. "महिलांना सक्षम बनवणे..." हा महायुती सरकारचा प्रमुख अजेंडा आहे. त्यासाठीच "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" राबवण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून आपल्या भोसरी मतदार संघामध्ये सुमारे ६७ हजार माता-भगिनींना लाभ मिळाला आहे. महिलांना प्रतिमहिना १५०० रुपये सन्मान निधी मिळत आहे. यासह शेतकरी, कष्टकरी, नोकरदार आणि व्यावसायिक बांधवांसह सर्व जाती-धर्मातील समाजघटकांच्या हितासाठी 'शेवटच्या घटकाचा विकास' या भावनेतून महायुती सरकार काम करीत आहे.

---

## गाठीभेटी घेत, नागरिकांशी संवाद साधत अजित गव्हाणे यांच्या प्रचाराची सांगता !

### महिलांच्या लक्षणीय उपस्थितीत पदयात्रा ; नागरिकांना भावनिक साद

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या गाठीभेटी घेत, त्यांच्याशी संवाद साधत महाविकास आघाडीचे भोसरी मतदारसंघाचे उमेदवार अजित गव्हाणे यांनी त्यांच्या प्रचाराची सांगता सोमवारी ( दि.18) केली. नागरिकांच्या पुढाकारातून भोसरी मतदारसंघांमध्ये परिवर्तनाचा लढा उभारला. नागरिकांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आता नागरिकांच्या हाती निवडणूक सोपवून निवडणूक प्रचाराची सांगता केली असल्याच्या भावना अजित गव्हाणे यांनी यावेळी व्यक्त केल्या. सोमवारी प्रचाराच्या सांगता दौऱ्यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. महिला सुरक्षा, शिक्षण, बेरोजगारी आणि रोजगार या मुद्द्यावर महिलांनी यावेळी मतदारांना परिवर्तनाचे आवाहन देखील केले.



महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे भोसरी मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचाराची सांगता सोमवारी झाली. सोमवारी सकाळी त्यांनी भोसरी परिसरातील मंदिरांमध्ये दर्शन घेतले. यावेळी नागरिकांच्या गाठीभेटी त्यांनी घेतल्या. सकाळी त्यांच्या निवासस्थानी ज्येष्ठ नागरिक, परिसरातील महिला भगिनींनी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या. परिसरातील नागरिकांशी त्यांनी यावेळी संवाद देखील साधला. मुख्य म्हणजे आज त्यांच्या प्रचाराची सांगता महिला आघाडीच्या पुढाकारातून करण्यात आली. महिला भगिनींनी यावेळी फेटे परिधान करून 'राम कृष्ण हरी वाजवा तुतारी'अशा घोषणा देत प्रचाराची सांगता केली. जागोजागी अजित गव्हाणे यांना औक्षण करण्यात येत होते. साखर भरवत यावेळी गव्हाणे यांना विजयाचा तिलकही लावण्यात आला. आपले विजयासाठी महिला शक्तीची एकजूट परिवर्तनाची नांदी ठरेल अशा शुभेच्छा देखील देण्यात आल्या. यावेळी महिला कार्यकर्त्यांनी नागरिकांना भावनिक साद घालत येत्या 20 नोव्हेंबर रोजी 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्ह समोरील बटन दाबून अजित गव्हाणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन देखील केले.

## मावळातील मायबाप जनतेने मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत : आमदार सुनील शेळके

### जोरदार शक्तीप्रदर्शनाने आमदार शेळके यांच्या प्रचाराची कामशेत येथे सांगता

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील निवडणुकीच्या वेळी मी एक संधी मागितली होती. ती संधी मिळाल्यानंतर मावळचा विकास आणि मायबाप जनतेची सेवा करण्यासाठी गेली पाच वर्षे अहोरात्र झटलो. आता जनतेच्या भावना लक्षात घेऊन पक्षाच्या नेत्यांनी मला दुसऱ्यांदा संधी दिली आहे. गेल्या पाच वर्षात केलेल्या कामांची पावती म्हणून मायबाप जनतेने आता मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत, असे भावनिक आवाहन मावळ विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार सुनील शेळके यांनी केले.



मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस- भाजप- शिवसेना- आरपीआय- एसआरपी महायुतीचे उमेदवार आमदार सुनील शेळके यांच्या निवडणूक प्रचाराची सांगता आज दुपारी कामशेत येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते. त्यापूर्वी त्यांनी नाणे मावळातील कांब्रे, नाणे, अहिरवडे, नायगाव, चिखलसे, कुसगाव खुर्द या गावांचा जनसंवाद दौरा केला.

जनसंवाद दौऱ्यात आमदार शेळके यांच्या बरोबर ज्येष्ठ नेते गणेशअप्पा ढोरे, माजी सभापती गणपतराव शेडगे, कार्ला येथील एकाविरा आई देवस्थानचे विश्वस्त दीपक हुलावळे, युवा नेते देवा गायकवाड, संदिप आंद्रे, यांच्यासह साईनाथ गायकवाड, स्वामी गायकवाड, नवनाथ ठाकर, भाऊ दाभणे, संतोष कोंढरे, सुभाष शिंदे, तुकाराम शिंदे, सुरेश कोंढरे, नितीन शेलार, सागर शेलार, कैलास कोंढरे आदी मान्यवर तसेच महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक गावात आमदार शेळके यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत झाले.

कोणत्याही दबावाला अथवा प्रलोभनाला बळी पडता तालुक्यातील सर्व मतदारांनी बाहेर पडून मतदानाचा हक्क बजावावा, गर्दी असेल तरी थांबुन मतदान करावे, असे आवाहन शेळके यांनी शेवटी केले.

# प्रचाराच्या तोफा थंडावल्या, आता लक्ष मतदानाकडे

## आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी, उखाळ्यापाखाळ्यांना पूर्णविराम, बड्या लढतींबद्दल सगळ्यांच्याच मनात उत्सुकता

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या प्रचारसभा आता थंडावणार असून सर्वांचेच लक्ष २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानाकडे लागले आहे. २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार असून त्यानंतरच उमेदवारांचे भवितव्य स्पष्ट होणार आहे. राज्याप्रमाणेच पुणे शहर आणि जिल्ह्यातील प्रचाराची धामधूम संपली असून आता सर्वांचे लक्ष जास्तीत जास्त मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यावर असेल.

पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघापैकी तीन मतदारसंघात महाविकास आघाडीतील बंडखोरांनी पक्षादेश झुगारून मैदानात उतरण्याचा निर्णय घेतल्याचे पाहायला मिळाले. कसबा विधानसभा मतदारसंघात माजी महापौर कमल व्यवहारे, तर पर्वती मतदारसंघातून काँग्रेस माजी उपमहापौर आबा बागूल आणि शिवाजीनगर मतदारसंघातून मनीष आनंद यांनी काँग्रेस पक्षातून बंड पुकारले. याउलट भाजप महायुतीला नाराज नेत्यांचे बंड शमविण्यात यश आले. उमेदवार नक्की केल्यावर सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारावर भर दिला. गेले काही दिवस शहर आणि जिल्ह्यातील सर्वच मतदारसंघात प्रचाराची धावपळ पाहायला मिळाली. महाविकास आघाडी आणि महायुतीसह सगळेच उमेदवार पदयात्रा, प्रचारफेऱ्या, कोपरा सभा, घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधण्यात व्यस्त होते. त्यानंतरच्या काळात प्रत्येक पक्षाच्या बड्या नेत्यांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतल्या. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख (शरद पवार गट) शरद पवार, त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार, बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनी आपापल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या.

महायुती आणि महाविकास आघाडीची थेट लढत असलेल्या अनेक मतदारसंघात बड्या नेत्यांच्या सभा पार पडल्या. या सभांमधून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. याखेरीज विकासाच्या मुद्यांवरही वादविवाद ऐकायला मिळाला. शहरातील सर्वच मतदारसंघात आणि विशेषतः पोटनिवडणुकीमुळे गाजलेल्या कसबा मतदारसंघातील घडामोडींवर सर्वांचेच लक्ष लागल्याचे दिसून आले. महायुतीचे रवींद्र धंगेकर यांच्या विरोधात भाजपने हेमंत रासने यांना उमेदवारी दिली आहे. इथे मनसेनेही गणेश भोकरेंना मैदानात उतरवले आहे. काँग्रेसच्या कमल व्यवहारे यांनी अपक्ष लढत देण्याचा निर्णय घेतल्याने इथल्या निकालाबद्दल उत्सुकता लागली आहे. 'कसबा'प्रमाणेच पर्वती आणि शिवाजीनगर मतदारसंघातही काँग्रेसच्या बंडखोरांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांसमोर आव्हान उभे केल्याने तिरंगी लढतीत कोणाला फायदा होणार, याकडे लक्ष लागले आहे

पिंपरी मतदारसंघात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांच्या विरोधात शरद पवारांनी सुलक्षणा शीलवंत यांना उतरवले आहे, तर चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपच्या शंकर जगताप आणि शरद पवार गटाच्या राहुल कलाटे यांच्यात लढत होत आहे. याशिवाय भोसरी मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या विरोधात शरद पवारांनी अजित गव्हाणे यांना मैदानात उतरवले आहे.




### जिल्ह्यातील तीन दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा

» जिल्ह्यातील आकर्षणाच्या केंद्रस्थानी असलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार या चुलत्या-पुतण्यातील लढतीकडे तर अख्ख्या राज्याचे अक्ष लागलेले आहे. इंदापुरात ऐनवेळी तुतारी घेतलेल्या हर्षवर्धन पाटील यांच्या विरोधात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे दत्ता भरणे यांच्यात लढत होत आहे. पक्षफुटीत अजित पवारांसोबत गेलेले आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या विरोधात शरद पवारांनी देवदत्त निकम यांना उभे केले आहे.

---

# शेवटच्या 72 तासात ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास बंदी

## अन्यथा गुन्हा होणार दाखल ; निवडणुक आयोगाचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया बुधवारी (दि.२०) पार पडणार आहे. त्यामुळए १८ ते २० नोव्हेंबर या दोन दिवसाच्या ७२ तासाता परिसरात ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली. ध्वनीक्षेपकाचा वापर केल्यास गुन्हा दाखल होणार असल्याचाही इशारा निवडणुक आयोगाने दिला आहेय

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता ( बी.एन.एस.एस ) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे आदेश ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास बंदी घालण्याचा आदेश निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणुक अधिकारी यांनी काढला आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहिता १५ ऑक्टोबर पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहणार आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये १९८ शिरूर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, ११२ खडकवासला, २१२ पर्वती २१३ हडपसर २१४ पुणे कॅन्टमेंन्ट, २१५ कसबा पेठ असे एकूण ११ विधानसभा मतदार संघात बुधवारी (दि.२०) मतदान होणार असून मतमोजणी ही दिनांक २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. निवडणूका या सुरळीतपणेच शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत फायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून राष्ट्रीय निवडणुक आयोगाने मतदान संबंधीत शेवटच्या ७२ तासात मतदान प्रक्रिया संपेपर्यंत पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारे ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई असल्याबाबत आदेश दिला आहे. आदेश संपूर्ण पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत दिनांक १८ नोव्हेंबरचे संध्याकाळी ६ वाजल्यापासून ते दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत लागू राहील. या आदेशाचा भंग करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार शिक्षेस पात्र राहील. असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.




# मतदानासाठी मतदार ओळखपत्र नसल्यास अन्य 12 प्रकारचे पुरावे ग्राह्य

## अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली

**पुणे | प्रतिनिधी**

मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्र जवळ नसल्यास अन्य १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी असल्याचेही ते म्हणाले.

पुणे जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीअंतर्गत २० नोव्हेंबर रोजी २१ मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी ही माहिती दिली आहे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र आहे अशा मतदारांनी मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करावे.

छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र (जॉब कार्ड), बँक किंवा टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्र असलेले पासबुक, श्रम मंत्रालयाच्या योजनेंतर्गत दिलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), स्थायी खाते क्रमांक (पॅन कार्ड), राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक (आरजीआय) यांनी दिलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), छायाचित्र असलेली निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रे, केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले, छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र या १२ पुराव्यांचा समावेश आहे.

मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार छायाचित्र ओळखपत्र असल्यास मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक पुरावा सोबत न्यावा.



# महाबाईक रॅलीद्वारे शंकर जगताप यांचे शक्तिप्रदर्शन

## चिंचवड विधानसभा मतदारसंघातील मतदारांना अभिवादन करून केली प्रचाराची सांगता

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - रिपाइं (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आज संपूर्ण मतदारसंघात भव्य महाबाईक रॅली काढण्यात आली. या महाबाईक रॅलीच्या माध्यमातून शंकर जगताप यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत मतदारसंघातील नागरिकांना अभिवादन केले.

लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृती स्थळाला अभिवादन करून या महाबाईक रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर ही रॅली पिंपळे गुरव मेन बस स्टॉप मार्गे सृष्टी चौक, पिंपळे गुरव - सुदर्शन नगर चौक, पिंपळे गुरव - स्वराज्य चौक - काटे पेट्रोलपंप - महादेव मंदिर, पिंपळे सौदागरनंतर रहाटणीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जगताप यांनी अभिवादन केले. पुढे ही रॅली गोडांबे चौकमार्गे नखाते वस्ती चौक, रहाटणी - रहाटणी फाटा - काळेवाडी फाटा - संदीप कस्पटे यांचे जनसंपर्क कार्यालय - छत्रपती चौक - म्हसोबा चौक - दत्त मंदिर चौक, वाकड - उत्कर्ष चौक - डांगे चौक - पद्मजी पेपर मिल, दत्त नगर - मोरया गोसावी मंदिर, चिंचवड - चाफेकर चौक, चिंचवड - प्रेमलोक पार्क, दळवी नगर - दळवी नगर - आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसर - स्पाईन रोड, वाल्हेकरवाडी - वाल्हेकरवाडी - नॅनोस्पेस होम्स चौक - शिंदे वस्ती - एस. बी. पाटील रोड - चंद्रभागा कोर्नर, रावेत - मुकाई चौक, किवळे - किवळे गावठाण - सिमबोयसीस कॉलेज मामुर्डी - मामुर्डी गावठाण - साई नगर - शिंदे पेट्रोल पंप - विकास नगर - टी.सी. कॉलनी अशी होत मुकाई चौक, रावेत या ठिकाणी रॅलीची सांगता करण्यात आली.

यावेळी प्रत्येक गावागावात आणि चौकाचौकात मोठ्या संख्येने एकत्रित येऊन ग्रामस्थांनी ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये आणि फुलांची उधळण करत या रॅलीचे व शंकर जगताप यांचे जोरदार स्वागत केले. तसेच या रॅलीमध्ये सहभागी झाले. या रॅलीत महिला कार्यकर्त्यांचाही सहभाग लक्षणीय आणि उत्स्फूर्त पाहायला मिळाला. तर मतदारसंघातील विविध सामाजिक संघटनांनी रॅलीत शंकर जगताप यांना पाठींब्याचे पत्र देत त्यांना १०० टक्के मतदान देणार असल्याचा विश्वास दिला.

या महाबाईक रॅलीत आमदार अश्विनी जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, कार्याध्यक्ष शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नाना काटे, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, रिपाइं (आठवले) पक्षाचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, यांच्यासह चिंचवड मतदारसंघातील महायुतीच्या सर्वच घटकपक्षाचे सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने या बाईक रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

दरम्यान, हजारोंच्या संख्येने आलेल्या कार्यकर्त्यांनी या महाबाईक रॅलीत शिस्तबद्ध आणि शांततेचे दर्शन घडवत सर्वसामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांकडून कार्यकर्त्यांचे कौतुक होत होते. ही महाबाईक रॅली पाहून नागरिकांनी ही जणू काही 'महाविजय रॅली' असल्याची भावना व्यक्त केली.



> मागील अनेक वर्षांपासून चिंचवडच्या जनतेने स्व. लक्ष्मणभाऊ जगताप व आमदार अश्विनी जगताप यांच्या माध्यमातून आमच्यावर प्रचंड विश्वास व्यक्त करून आम्हाला भरभरून प्रेमही दिले. यावेळीही तुमचा हाच विश्वास आणि प्रेम तुमच्या मतरुपी आशीर्वादातून मला मिळावा अशी प्रार्थना मी आपणांस करत आहे. मी आपल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे. चिंचवड मतदारसंघातील सर्व मतदार बंधू भगिनींना मी विनम्र आवाहन करतो की, येणाऱ्या २० तारखेला आपण सर्वांनी आपला मतदानाचा हक्क बजावून एक सक्षम आणि प्रगतिशील महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्यात पुन्हा एकदा जनतेचे सरकार म्हणजेच आपले महायुतीचे सरकार आणण्यासाठी आपले बहुमूल्य योगदान द्यावे.
>
> **- शंकर जगताप, महायुतीचे उमेदवार.**

# राहुल लाटेंना एक संधी द्या : खासदार अमोल कोल्हे

## शरद पवार साहेबांचा विचार विजयी करा : खासदार अमोल कोल्हेंची मतदारांना साद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवार साहेबांचे पिंपरी चिंचवड शहरावर व शहराचं पवार साहेबांवर प्रेम आहे. पवार साहेबांनी कित्येक वर्षांनंतर तब्बल साडेतीन तास रोड शो आणि सभेसाठी चिंचवड विधानसभेला वेळ दिली. चिंचवडमध्ये भाकरी फिरवायची आहे. शरद पवार यांना राहुल कलाटेंवर विश्वास आहे की हेच नेतृत्व उद्या पिंपरी-चिंचवड शहराला चांगली दिशा देऊन सर्वांगीण विकास करेल. त्यामुळे गेली १५ वर्षे फसलेले घराणेशाहीचे गणित सुधारून राहुल कलाटे यांच्या रूपाने शरद पवार साहेबांचा विचार विजयी करा. ८४ वर्षांच्या त्या बापाला आठवा, आयुष्याच्या संध्याकाळी त्याला हरु द्यायचं नसतं. अशी भावनिक साद खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी चिंचवडकर मतदारांना घातली.

औद्योगीक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात नागरी समस्या, मूलभूत सोयी सुविधांची कमतरता जाणवत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. त्यामुळे, आपल्या भाच्यांना कंत्राट देणाऱ्या, जमिनी हडपणाऱ्यांना नाही तर तुमच्या उपयोगी येणाऱ्या राहुल दादांना एकदा संधी द्या. यंदा वारं फिरलंय, चिंचवडमध्ये परिवर्तन अटळ असल्याचे अमोल कोल्हे यांनी सांगितले. चिंचवडमधील महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांच्यासाठी काल अमोल कोल्हे यांनी रावेत – किवळे भागात रोड शो केला तसेच वाल्हेकरवाडी, काळेवाडी इथे सभे दरम्यान कोल्हे बोलत होते.

यावेळी संजोग वाघेरे पाटील, मच्छिन्द्र तापकीर, गायक डॉ. उत्कर्ष शिंदे, अनिता उर्फ माई तापकीर, मयुर कलाटे, इम्रान शेख, सागर तापकीर, अनिता तुतारे, सुजाता नखाते, सुशिला पवार, सायली नढे, उल्हास कोकणे, तौफिक तांबोळी, रवी नांगरे, सचिन कोंढरे, दिनेश नढे, पौलाद बारसे, कुंदन शिंगटे, प्रकाश मुरकुटे, ज्ञानेश्वर मलशेट्टी, संजय मोरे उपस्थित होते.



### 'बचेंगे तो और भी लढेंगे'ची परंपरा – डॉ कोल्हे

» फुले, शाहू आंबेडकरांच्या महाराष्ट्रात येऊन निम्मा उत्तर प्रदेश पोट भरतो आणि उत्तरप्रदेशचे योगी येऊन 'बटेंगे तो कटेंगे'ची भाषा करताहेत तर त्यांना सांगायची वेळ आलीय हा महाराष्ट्र आहे. इथली परंपरा बचेंगे तो और भी लढेंगे वाली आहे. बचेंगे तो कटेंगे सारखं विषारी बीज त्यांच्या गंगा-यमुना काठच्या भुसभुशीत मातीत उगवत असेल. हा काळ्या कातळाचा सह्याद्री आहे. इथे छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींच्या, बारा बलुतेदारांना आणि सोळा अलुतेदारांना घेऊन स्वराज्याच स्वप्न उभ केल होतं. त्या महाराष्ट्रात जातीय विष पसरत नाही.

# मुळशीकरांची वज्रमूठ महायुतीच्या पाठिशी!

## ज्या पक्षाने मला मोठं केलं, त्या पक्षाला मोठं करा - मुरलीधर मोहोळ

**पुणे | प्रतिनिधी**

मुळशी करांनी ठरवलंय आणि ते खरं झालं नाही असं कधीही झालं नाही. भारतीय जनता पक्षाने तुमच्यातल्या एका मुलाला संधी देऊन मोठं केलंय. त्यामुळे पक्षालाही आता मोठं करावं, असं आवाहन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज केले. तसेच, चंद्रकांतदादा पाटील यांनी पालकमंत्री आणि मंत्री म्हणून आतापर्यंत आपल्या तालुक्यातील विकासकामांना ५३५ कोटीचा भरीव निधी दिला आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

भोर-मुळशी- मावळ तालुक्याचा मेळावा कोथरूडमधील आशिष गार्डन येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी भाजप महायुतीचे कोथरूडचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील, खडकवासल्याचे भीमराव तापकीर, भोर मुळशीचे शंकर मांडेकर, बाबासाहेब कंधारे, अंकुश मोरे, माऊली साठे, धैर्यशील ढमाले, डॉ. संदीप बुटाला, गोविंद आंग्रे, सुशील मेंगडे, गणेश वर्पे, अजय मारणे, नितीन शिंदे, निलेश शिंदे, सौ. मोनिका मोहोळ, अल्पना वर्पे यांच्या सह मुळशी तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, मुळशी करांनी ठरवलंय आणि ते खरं झालं नाही असं कधीही झालं नाही. २०१७ ची निवडणुकीत मुळशीकरांच्या निश्चयावर मी नगरसेवक होऊन राजकीय प्रवास सुरू झालो. आज तुमचा मुळशीकर माननीय नरेंद्र मोदीजींसोबत काम करतोय. तुमचा माणूस मोठा होतोय. हे सर्व भारतीय जनता पक्षाने घडवलंय. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला मोठं केलं पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, शरद ढमाले यांच्यानंतर शंकर मांडेकर यांच्या रुपाने १५ वर्षांनंतर तालुक्याला नेतृत्व मिळालं आहे. त्यामुळे मुळशीकरांनी विचारांनी एकत्र आलं पाहिजे. उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा दिवस संपल्यानंतर महायुतीचा उमेदवार निवडून आणण्याचं आम्ही ठरवलं आहे. शंकरभाऊंचा शून्यातून प्रवास सुरू झालाय. त्यामुळे आता आलेली संधी कोणीही सोडू नये. ज्यांचं कोथरुड आणि खडकवासला अशा शहरी भागात मतदान आहे, त्यांनी शहरात मतदान करावे. तर ज्यांचं ग्रामीण भागात मतदान आहे; त्यांनी जास्तीत जास्त मतदान करुन महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले.

चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, कोथरुड आणि भोर विधानसभा मतदारसंघावर मुळशीकरांचा प्रचंड प्रभाव आहे. २०१९ मध्ये मुरलीधर मोहोळ यांच्या माध्यमातून आयोजित मेळाव्याची मदत झाली. त्या मेळाव्यात मी म्हटलं होतं. त्यानुसार तशी स्थिती आणण्यात देवेंद्रजी फडणवीस आणि मला संधी मिळाली. पक्ष नेतृत्वाच्या आदेशानुसार काम करण्याचा प्रघात आहे. अडीच वर्षांपैकी एक वर्षे मला पुण्याचं पालकमंत्री पद मिळालं. तेव्हा मुळशीचा जो ही व्यक्ती काम घेऊन आल्यावर, ती पूर्ण केली.

पाटील पुढे म्हणाले की, सध्या मी व्यक्ती विकासावर भर दिलाय. झाल उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक दुर्बल कुटुंबांना मदत केली. त्यासोबतच अनेक मुलींना शिक्षणासाठी मदत करतो आहे. राज्यात महायुतीचे सरकार येणार हे नक्की आहे. हरियाणा मध्ये मतांचा टक्का वाढल्याने एनडीएचं सरकार आलं. हे सर्वेक्षणाच्या पकडीत येत नाही. त्यामुळे मताचा टक्का वाढवला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी खडकवासला मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार भीमराव तापकीर आणि भोर मुळशीचे महायुतीचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी आपल्या मनोगतात जास्तीत जास्त मतदान करुन महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले.

### चंद्रकांतदादांनी तालुक्याला 535 कोटीचा निधी दिला - मुरलीधर मोहोळ

» चंद्रकांतदादा महायुती सरकार मध्ये अडीच वर्षे मंत्री आहेत. या अडीच वर्षाच्या काळात आपल्या तालुक्यातील अनेक कार्यकर्ते आणि सरपंच मुळशीच्या कामासाठी दादांना भेटत होते. त्या प्रत्येकाची कामे दादांनी करुन दिली आहेत. मागच्या काळातही सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून ३८८ कोटींची रस्त्याची कामं मुळशीत झाली. त्याआधी ६३ कोटी, आणि आता अडीच वर्षात ८४ कोटींची विकासकामे केली. त्यामुळे मुळशीच्या विकासासाठी दादांनी खूप योगदान दिले आहे, असं मुरलीधर मोहोळ म्हणाले.

# मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी!

## मतदानासाठी मतदार छायाचित्र ओळखपत्र नसल्यास अन्य 12 प्रकारचे पुरावे ग्राह्य

**पुणे | प्रतिनिधी**

मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्र जवळ नसल्यास अन्य १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक मूळ पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येईल, अशी माहिती बारामती विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली आहे. मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी असल्याचेही ते म्हणाले.



मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र (जॉब कार्ड), बँक किंवा टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्र असलेले पासबुक, श्रम मंत्रालयाच्या योजनेंतर्गत दिलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), स्थायी खाते क्रमांक (पॅन कार्ड), राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक (आरजीआय) यांनी दिलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), छायाचित्र असलेली निवृत्ती वेतनविषयक कागदपत्रे, केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले, छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र या १२ पुराव्यांचा समावेश आहे.

### मतदान केंद्रात मोबाईलला बंदी

» मतदानाचे चित्रीकरण, छायांकन करुन गोपनीयता भंग करणे हा निवडणूक विषयक गुन्हा आहे. मतदान केंद्राच्या शंभर मीटर परिसरात तसेच मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ नुसार दंडनीय कारवाई करण्यात येणार आहे.